**<u>नियमित फौजदारी खटला क्र. २०/२०१९</u>**
**<u>निशाणी क्र. १२० पुरवणी</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.डी.एम. बर्गे यांच्यामार्फत सुरु.</u>**

गुन्हा क्र २६३ चा तपास माझ्याकडे दिनांक २५ रोजी आला होता. तपास काम आल्यानंतर मी प्रथम खबरी अहवाल वाचला होता. प्रथम खबरी अहवालामध्ये काही मयत व्यक्तीची नावे नमूद करण्यात आली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, एका मयत व्यक्तीचे नाव नमूद करण्यात आले होते. तपासा दरम्यान एकूण २१ आरोपी निष्पन्न झाले होते परंतू फिर्यादी मध्ये इतर ५० असे नमूद केलेले आहे. २१ आरोपींपैकी कोणी गुन्ह्यामध्ये काय भूमिका पार पाडली होती ते मी सांगू शकत नाही. तपासा दरम्यान जखमी हरिष व एकनाथ यांचे कपडे मी जप्त केले नव्हते. पंचनाम्या दरम्यान घटनास्थळी शर्टची बटणे, चप्पला अथवा इतर काही वस्तू इत्यादी मिळून आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपासा दरम्यान फिर्यादी एकनाथ याच्या गळ्यातील चैन व खिश्यातील १५,००० रूपये रक्कम गहाळ झाल्याबाबत आढळून आले नाही तसेच निष्पन्न देखील झाले नाही. घटनास्थळाचा पंचनामा मी दिनांक २५ रोजी दुपारी केला. तपासादरम्यान व पंचनाम्या वेळी फिर्यादी आमच्या सोबत होता. फिर्यादी मध्ये ५० लोक नमूद होते परंतू तपासादरम्यान २१ लोक निष्पन्न झाले त्याबाबत फिर्यादीचा पुरवणी जबाब मी नोंदविलेला नाही.

घटनास्थळाचा पंचनामाकरित असताना तारखेमध्ये खाडाखोड झाली होती. तारिख २५ ऐवजी १५ अशी लिहिली गेली होती. तारखेमध्ये महिन्याच्या मजकूरामध्ये खाडाखोड झाल्याचे मला आता आठवत नाही. घटनास्थळाचे पंचनाम्या वेळी काढण्यात आलेल्या नकाशामध्ये मोजमापे नमूद नाहीत. पंचनाम्यामध्ये फिर्यादीने घटनास्थळ दाखविले असे नमूद केले आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की, पंचनाम्यामध्ये फिर्यादीने घटनास्थळ दाखविले असे नमूद नाही.

हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा क्र २६२ हा आरोपी क्र १ यांनी फिर्यादी व साक्षीदार हरिष व इतर यांचे विरूध्द अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये दाखल केला होता. हरिष यास दि २५ रोजीच अटक झालेबाबत मला माहिती नाही. दिनांक २६ रोजी हरिष डि. वाय. एस. पी. यांचे ताब्यात होता याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि २६/०९/२०१८ रोजी मी हरिष याचा

जबाब नोंदविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दोषारोप पत्रामध्ये हरिष याचा जबाब दि २६/०९/२०१८ रोजी नोंदविला व तो जबाब दाखल केला आहे परंतु तो चुकिचा आहे.

आरोपी क्र १ ते १६ यांना मी एका ठिकाणावरून आसरे येथून अटक केली आहे. सर्वांचे अटक पंचनामे वेगवेगळे केले होते. साक्षीदार पुन्हा सांगतो की, अटक पंचनामा एकच तयार केला होता. आरोपींची वैद्यकीय तपासणी मी करुन घेतली होती परंतु त्याचा अहवाल दोषारोप पत्रासोबत दाखल केला आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. आरोपी क्र १ ते १६ यांना अटक करून त्यांच्या पैकी धर्मेंद्र ट्रॅक्टर मधून घेऊन आलो. पोलीस स्टेशनमध्ये आल्यानंतर ठाणे दैनंदिनीला तशी नोंद केली होती किंवा कसे याबाबत मला आता आठवत नाही. हरिष हा २५ तारखेनंतर ३ महिने दुस-या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी मध्ये असल्याबाबत मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र १ रुपेश हा दि २५/०९/२०१८ रोजी सायंकाळी ५.४५ ते ६.४५ पर्यंत डी.वाय.एस.पी. यांचेसोबत पंचनाम्यास हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, मी रिमांड वेळेस न्यायालयात सादर केलेल्या अहवालामध्ये तारिख २५/०९/२०१८ व वेळ १८.३८ नमूद केली आहे ती खोटी आहे. फिर्यादी एकनाथ हा फिर्याद दाखल केल्यानंतर ३ महिने फरार असल्याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, गुन्हा दाखल केल्यानंतर ३ महिने माझी व एकनाथची भेट झाली नाही.

आर्टिकल अ वरिल छायाचित्र कोणी काढले होते हे मला सांगता येणार नाही. सदर छायाचित्राची पावती अथवा दुय्यम प्रत माझ्याकडे नाही. छायाचित्र काढणा-या व्यक्तीचे टिपण नोंदविले होते किंवा कसे याबाबत मला आता मला काही आठवत नाही. घटनेच्या वेळी आरोपी व फिर्यादी एका ठिकाणी हजर होते याबाबत तसे टॉवर लोकेशन घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र १२१ वरिल मिळकत उतारा हा घटनास्थळाचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर उता-यावर प्लॉट क्रमांक १८ नमूद नाही. मुद्देमाल ट्रॅक्टरचा क्रमांक MH 11 8101 असा होता. ट्रॉलीला नंबर नव्हता. ट्रॉली चार चाकी होती.

मुंबई पोलीस कायदा अन्वये काढलेला प्रतिबंधात्मक आदेश त्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द केला होता. कोणत्या वर्तमानपत्रात सदर आदेश प्रसिध्द करण्यात आला होता त्या वर्तमानपत्राची प्रत दोषारोप पत्रामध्ये दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसा कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्याने तशी प्रत सामील केलेली नाही. जखमी एकनाथचे प्रमाणपत्र मला दोन तीन दिवसांनी मिळाले होते. एकनाथच्या अंगावर मला जखम दिसून आली नाही.

हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर जाऊन पंचनामा केला तसेच छायाचित्र घेतले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गुन्ह्याकामी ट्रॅक्टर व ट्रॉली जप्त केली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शरद भोसलेचा जबाब मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या अनुषंगाने मी दोषारोप पत्र तयार केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या तपासामध्ये आरोपीने गुन्हा केला नाही असे निष्पन्न झाले होते तरी देखील खोटे दोषारोप पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार लता ही त्यावेळी आसरे ग्रामपंचायतीची सदस्य होती तसेच साक्षीदार अशोक सनस हे उपसरपंच होते. हे म्हणणे खरे नाही की, मी राजकीय पुढा-यांच्या दबावाखाली खोटे दोषारोप पत्र दाखल केले आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती**

**कोरेगांव** **(सी. एस. पाटील)**

**दिनांक - ११/११/२०२५** **प्रथम** वर्ग **न्यायादंडाधिकारी, कोरेगांव.**